PARLE MAHOTSAV
Organiser - ADV. PARAG ALAVANI, MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

**कृपया प्रसिद्धीसाठी**

## २० व्या पार्ले महोत्सवाचा शानदार शुभारंभ आज

कला, क्रीडा व संस्कृती ह्यांचा महासंगम म्हणजेच पार्ले महोत्सव ह्या वर्षी द्विदशकपूर्तीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. आज २१ डिसेंबर रोजी पार्ले महोत्सवाचे उद्घाटन होत असून विसाव्या पार्ले महोत्सवाचा हा शुभारंभ सोहळा आगळा वेगळा आखण्यात आला आहे.

विलेपार्ल्याच्या वामन मंगेश दुभाषी मैदानावर सायंकाळी ५:३० वाजता संपन्न होणाऱ्या ह्या उद्घाटन सोहळ्यासाठी खासदार पूनम महाजन ह्या प्रमुख अतिथी असून, पार्ले महोत्सवाचे शिर्षक प्रायोजक असणारे सारस्वत बँकेचे अध्यक्ष श्री. गौतम ठाकूर, पार्ले महोत्सवाच्या आयोजनात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या साठये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव राजवाडे, पार्ले महोत्सवाच्या सहयोगकर्त्या व ज्यांच्या पतीच्या नावाने अर्थात स्वर्गीय डॉ. नीतू मांडके ह्यांच्या नावाने सर्व पारितोषिके दिली जातात त्या डॉ. अलका मांडके (अध्यक्षा, केशवसृष्टी) आदि सन्माननीय अतिथी देखील ह्या प्रसंगी उपस्थित राहणार आहेत.

खास २० व्या पार्ले महोत्सवाच्या निमित्ताने प्रमुख संयोजक आमदार पराग अळवणी ह्यांनी खास पाच क्रीडापटूंचा गौरव ह्यानिमित्त करण्याचे योजिले आहे. लंडन येथे नुकत्याच पार पडलेल्या दिव्यांग विश्वचषक स्पर्धेत आपल्या देशाचा क्रिकेटचा दिव्यांगांचा संघ विजयी ठरला. त्या संघाचे कर्णधार श्री. विक्रांत केणी दोन खेळाडू श्री. रविंद्र सांटे, श्री कुणाल फणसे, मुख्य प्रशिक्षक श्री. सुलक्षण कुलकर्णी व आपल्या देशातर्फे नियुक्त मुख्य व्यवस्थापक श्री. विनोद देशपांडे आदिंचा ह्यानिमित्त गौरव होईल व तसेच त्यांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न होईल.

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

४० हून अधिक स्पर्धा, हजारो स्पर्धक व अगणित प्रेक्षक ह्यांचा महोत्सव म्हणून लोकप्रिय असलेल्या पार्ले महोत्सवच्या ह्या शुभारंभ सोहळ्याचे सर्वांसाठी खुले निमंत्रण आहे. विलेपार्ले परिसरातील कला व क्रिडा क्षेत्रातील अनेक मान्यवर तत्प्रसंगी उपस्थित राहणार असून उद्घाटन सोहळ्या नंतर लगेच ५० मि. धावणे व स्लो सायकलिंग स्पर्धा सुरू होईल. पार्ले महोत्सवाच्या क्रिडाविषयक सर्व स्पर्धा ह्या दुभाषी मैदानावर होतात तर सर्व कलाविषयक स्पर्धा ह्या साठये महाविद्यालयात संपन्न होतात. दुसऱ्या दिवशी अर्थात २२ डिसेंबर रविवारी सकाळी ९ वाजता साठये महाविद्यालयात गायन स्पर्धा, कॅराओके स्पर्धा व श्लोक पठण आदिंचे उद्घाटन संगीतकार विकास भाटवडेकर ह्यांच्या शुभहस्ते होणार असल्याची माहिती विलेपार्ले कल्चरल सेंटरचे अध्यक्ष पराग अळवणी ह्यांनी दिली.

२१ डिसेंबर ते २९ डिसेंबर ह्या कलावधीत आयोजिलेल्या ह्या पार्ले महोत्सवात गायन, नृत्य, चित्रकला, बुद्धिबळ, कबड्डी, व्हॉलीबॉल, बॉक्स क्रिकेट, भारत को जानो, जेष्ठ नागरिक, होम मिनिस्टर, सुदृढ बालक अशा लहानग्यांपासून जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांसाठी सुयोग्य वयोगटश: स्पर्धा होणार आहेत.